**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी</u>**
मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :–

**माझे नाव** : **मंगेश साहेबराव खरमाळे**,
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : पोलीस हेड कॉस्टेबल,
नेमणूक : नगर तालुका पोलीस स्टेशन, ता.जि. अहमदनगर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री.बी.वाय. महाले</u> :**

दि.२३/०६/२०२४ रोजी मी नगर तालुका पोलीस स्टेशनला पोलीस हेड कॉस्टेबल या पदावर कार्यरत होतो. मी त्यादिवशी रात्री ०८.०० ते सकाळी ०८.०० असे पेट्रोलिंग मोबाईल ११२ च्या कर्तव्य बजावणीवर होतो. माझेसोबत वाहनचालक होता.

२. मध्यरात्री ०१.०० वाजताचे सुमारास पेट्रोलिंग करता असताना साई आनंद धाबा, सोलापुर रोड येथे लक्जरी बसचा अपघात झाला असल्याची माहिति मिळाली. त्यानुसार मी जागेवर गेलो. तेथे मला एक लक्जरी बस व लक्जरी बसच्या समोर एक ट्रक उभा असून त्यांचेमध्ये अपघात झाला असल्याचे दिसले. लक्जरी बसचा समोरचा व किन्नर बाजुचा संपुर्ण भाग डॅमेज झालेला होता. तसेच ट्रकचा मागचा भाग देखील डॅमेज झालेला दिसला. लक्जरी बसच्या बाजुला एक इसम रस्त्यावर जखमी अवस्थेत दिसला. अधिक चौकशी केली असता तो जखमी इसम लक्जरीमध्ये बसलेला होता व सदर दोन्ही वाहनांचे अपघाता दरम्यान त्याला मार लागला होता. लक्जरी बसचा चालक हा भरधाव वेगात वाहन चालवुन ट्रकला मागुन धडक दिल्याचे चौकशीदरम्यान समजले होते. त्यानंतर मी ॲम्ब्युलन्स घटनास्थळी बोलावुन जखमीला जिल्हा रूग्नालय, अहमदनगर येथे स्वत: नेले. त्या जखमी इसमाचे नाव दिपक पवार व लक्जरी बस चालकाचे नाव ईश्वर सातपुते असल्याचे समजले होते. दिपक पवार या जखमीला हॉस्पीटलमध्ये डॉक्टरांनी तपासले असता तो मृत झाला असल्याचे त्यांनी घोषीत केले. त्यानंतर मी सदर घटनेची फिर्याद दिली. मला आता फिर्याद दाखविला. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो.

त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.०८** देण्यात येते.

३. तपासादरम्यान घटनास्थळ मी पोलीसांना दाखविले होते. ज्या वाहनांचा अपघात झाला होता ते पाहिल्यास मी ओळखू शकतो. मला आता दोषारोपपत्रासोबत दाखल फेरिस्त पान क्र.३८/१ व ३८/१० सोबत दाखल फोटो दाखविले. ते अपघातातील लक्जरी बस व ट्रकचे आहेत. ज्या व्यक्तीच्या चुकीने अपघात घडला त्या व्यक्तीला मी ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. साक्षीदाराने आोपीकडे बोट करून तो ईश्वर सातपुते असल्याचे सांगितले.

सरतपास पुर्ण.

**शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे त्यांचे वकील श्री.शेडाळे :**

४. हे म्हणणे खरे आहे की, साई आनंद धाबा हा सोलापुर–अहमदनगर महामार्गावर सोलापुर कडुन अहमदनगरला येताना डाव्या बाजुला लागतो. सोलापुर–अहमदनगर महामार्गावर हा अवजड वाहनांसाठी व साध्या वाहनांसाठी वेगवेगळे ट्रॅक बनविलेले आहेत. त्या महामार्गवर सोलापुरकडुन अहमदनगरला येताना उजव्या बाजुची लेन अवजड वाहनांकरिता आहे. मला सांगता येणार नाही की, तथाकथीत घटनेत ट्रक हा अचानक त्याची लेन सोडुन डाव्या बाजुला धाब्याकडे वळण घेत असताना लक्जरी बसच्या समोर आला व त्यामुळे ट्रकचा डाव्या बाजुचा कोपरा लक्जरी बसला लागला. हे म्हणणे खरे आहे की, लक्जरीचाही केवळ किन्नर बाजुचा भाग डॅमेज होता, समोरचा इतर भाग डॅमेज नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, अपघात हा ट्रक चालकाच्या चुकीमुळे झाला होता व केवळ तेथील जमलेल्या लोकांच्या सांगण्यावरून मी अपघातात आरोपीची चुक आहे असे सांगतो.

५. मी स्वत: अपघात पाहिलेला नाही. मी जागेवर हजर लोकांच्याकडुन मिळालेल्या माहितीवरून अपघातात आरोपीची चुक आहे असे सांगतो. हे म्हणणे खरे

नाही की, मी सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकुर खोट व चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN

(**माया.अ. देशमुख**)

**दि.१८/०३/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०६, अहमदनगर.